MHBI160010892022

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.६५४/२०२२</u>**
**<u>मधील नि.५ वरील आदेश</u>**
**<u>अंजली वि. गहिनीनाथ व इतर</u>**

वादींनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १, २ व कलम १५१ अन्वये प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे विरूध्द दाखल केला आहे.

२. **वादींचे अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की,**

अर्जातील परिच्छेद क्र.२ मधील जमीनी या मौजे वारणी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथील आहेत. सदर मिळकती या प्रस्तुत अर्जातील वादग्रस्त मिळकती असून यापुढे सदर मिळकतीस वादग्रस्त मिळकती असे संबोधले आहे.

३. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.३ व वादी क्र.४ हे पती पत्नी असून वादी क्र.१ ते ३ ह्या त्यांच्या मुली आहेत. प्रतिवादी क्र.१ व २ हे पती पत्नी असून प्रतिवादी क्र.३ ते ५ ही त्यांची अपत्ये आहेत. वादग्रस्त मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित, हिंदू एकत्र कुटूंबाच्या मिळकती असून त्यांचे अद्याप सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. प्रतिवादी क्र.१ व २ हे एकत्र कुटूंबाचा कर्ता असल्याने सदर मिळकतींना महसूल अभिलेखात त्यांच्या नावची नोंद करण्यात आलेली आहे. प्रतिवादी क्र.३ हा व्यसनाच्या आहारी गेलेला असून तो दारू पिणे, पत्ते खेळणे अशा व्यसनाची पुर्तता करण्यासाठी वादग्रस्त मिळकतीपैकी काही मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना त्यांचा वादग्रस्त मिळकतीमधील हिस्सा विक्री करण्यास विरोध केला असता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादींना घराबाहेर हाकलून दिले. प्रतिवादी क्र.१ ते ३ हे कोणतेही कायदेशिर गरज नसताना वादग्रस्त मिळकतीची विक्री करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे दि.०३.०६.२०२२ रोजी वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना वादग्रस्त मिळकतींचे वाटप करून देणेची विनंती केली असता प्रतिवादींनी स्पष्ट नकार दिला. करीता, वादींनी प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता दाखल केला असून वादींना प्रस्तुतचा

अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

४. वादींचे पुढे असे कथन आहे की, वादग्रस्त मिळकतीत त्यांचा अविभाजीत हिस्सा आहे. त्यांना प्रथमदर्शनी केस असून न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादग्रस्त मिळकतीत त्रयस्त इसमांचा हक्क निर्माण केल्यास वादींना त्यांचे वादग्रस्त मिळकती मधील हक्कापासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ३ विरूध्द मनाई आदेश दिला नाही तर वादींचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल. म्हणून वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ३ विरुध्द दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो वादग्रस्त मिळकतींची विक्री, हस्तांतरण, तारण, गहाण, दान करु नये असा तात्पुरता मनाई आदेश मिळावा अशी विनंती केली.

५. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना समन्सची बजावणी होवूनही ते दाव्यात हजर न झाल्याने प्रस्तुत दावा त्यांचे विरूध्द एकतर्फा चालविण्यात येत आहे.

६. वरीलप्रमाणे वादींचा अर्ज व अभिलेखावर दाखल कागदपत्रे पाहता तसेच वादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी सकृतदर्शनी केस त्यांचे बाजूने असल्याचे शाबीत करतात काय? | होय. |
| २ | तुर्तातुर्त ताकिद न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल काय? | होय. |
| ३ | न्यायाचा तोल त्यांच्या बाजूने असल्याचे वादी शाबीत करतात काय? | होय. |
| ४ | काय आदेश? | अर्ज मंजूर. |

## :: <u>कारणमिमांसा</u> ::

७. वादींनी अर्जाच्या पुष्ठयर्थ अभिलेखावर दावा मिळकतींचा ८अ उतारे व ७/१२ उतारे दाखल केले आहेत.

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ३</u>** –

८. मुद्दा क्र.१ ते ३ चे अनुषंगे प्रस्तुतचा ताकीदीचा अर्ज निकाली करते समयी वादींनी त्यांची प्रथमदर्शनी केस शाबीत केली आहे काय हे पाहणे गरजेचे आहे. त्या अनुषंगे अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींच्या मते वादग्रस्त मिळकती या वडीलोपार्जित मिळकती असून त्याचे अद्याप वाटप झालेले नाही. असे असताना प्रतिवादी क्र.१ ते ३ हे वादग्रस्त मिळकतीस त्यांचे नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेवून कोणतीही कायदेशिर गरज नसताना वादग्रस्त मिळकतींची विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. उलटपक्षी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी न्यायालयात हजर राहून सदरची वादींची कथने नाकारलेली नाहीत. त्यामुळे वादीने शपथेवर केलेली कथने आहे तशी स्वीकारणे क्रमप्राप्त ठरते.

९. एकंदरीत मुद्दा क्र.१ ते ३ च्या अनुषंगे अभिलेखावर उपलब्ध पुरावा व त्यावरील कागदपत्रे यावरून दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित मिळकती असून त्यामध्ये वादींचा अविभाज्य हिस्सा आहे. अशा परिस्थितीत जर प्रतिवादी क्र.१ ते ३ विरूध्द तात्पुरता मनाई आदेश दिला नाही तर प्रतिवादी क्र.१ ते ३ हे वादग्रस्त मिळकतीची विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर प्रतिवादी क्र.१ ते ३ ने वादग्रस्त मिळकतींचे हस्तांतरण केले तर दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होवून दाव्याची अनेकता होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सदरची बाब टाळण्याकरीता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे विरूध्द मनाई आदेश पारीत करणे गरजेचे आहे. परिणामी वादींनी त्यांना प्रथमदर्शनी केस असल्याचे व न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. जर प्रतिवादी क्र.१ ते ३ विरूध्द मनाई आदेश दिला नाही तर वादींचे वादग्रस्त मिळकतीवरील हक्कास गदा निर्माण होवून वादींचे नुकसान होणार आहे. याउलट मनाई आदेश दिल्यास प्रतिवादी क्र.१ ते ३ चे वादग्रस्त मिळकती मधील हक्कावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. परिणामी प्रतिवादी क्र.१ ते ३ चे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता, मी मुद्दा क्र. १ ते ३ उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u>** –

१०. मुद्दा क्र. १ ते ३ बाबत वर नमूद चर्चेवरुन वादींनी वादग्रस्त मिळकती

संदर्भात तुर्तातुर्त ताकिदीसाठी लागणाऱ्या बाबी म्हणजेच प्रथमदर्शनी केस, न्यायाचा तोल व अपरिमित नुकसान प्रथमदर्शनी त्यांचे बाजूने असल्याचे शाबीत केले आहे. परिणामी, वादींचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. ४ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो वादग्रस्त मिळकतींचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण, विक्री, गहाण, दान, तारण, कर्जबोजा निर्माण करुन त्रयस्त ईसमांचा हक्क निर्माण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या विरुध्द देण्यात येतो.

३. अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालावर अवलंबून राहिल.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2024.08.22 11:55:17 +0530

(**अ.सं. जगताप**)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शिरूरकासार.

दिनांक २२/०८/२०२४

“I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order”.

Sd/-
[P.B. Kusumkar]
Stenographer Grade-3

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 22/08/2024 |
| Transcribed on | : | 22/08/2024 |
| Checked & signed on | : | 22/08/2024 |